महाराष्ट्र शासन
शासकीय परिवहन सेवा
सर पोचखानवाला मार्ग,वरळी,मुंबई,

दूरध्वनी :- ०२२-२४९३ १८५६ /०२२-२४९३ २९७२ / ०२२-२४९३ ९५५३ / ई.मेल -gts.worli@gmail.com

---

जा.क्र.शापसे/भांडार/२०२५/ लेखा शाखा -३/966.

दिनांक :- 27/06/25

शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या वाहनांची दुरूस्ती व देखभाल, शासकीय परिवहन सेवेच्या कार्यशाळेत करण्यात येते. वाहनांत वापरलेले ऑईल व वापरलेल्या बॅटरी यांची विक्री करण्यासाठी मोहोरबंद दरपत्रक मागवित आहोत. तरी, इच्छूक खरेदीदारकांनी दरपत्रकातील अटी व शर्ती विचारात घेऊन दरपत्रके सूचनेसोबत जोडलेल्या निविदा फॉर्ममधील विवरणपत्रात दर नमूद करुन दरपत्रक बंद लिफाफ्यात शासकीय परिवहन सेवा, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०३० यांच्याकडे दि. २७/०६/२०२५ ते दि.०७/०७/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत दोन लिफाफा पध्दतीने जमा करावेत. त्यानंतर आलेली दरपत्रके स्वीकारण्यात येणार नाहीत.

१. प्राप्त दरपत्रके नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांनी दिलेल्या तारखेस व वेळेला नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांच्या दालनात उघडण्यात येतील. खरेदीदारांना दरपत्रक उघडण्याची तारीख व वेळ पत्राद्वारे /फोनद्वारे कळविण्यात येईल. दरपत्रकाचे मोहोरबंद लिफाफे उघडतेवेळी खरेदीदार स्वतः किंवा त्यांचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

२. वाहनाचे वापरलेले ऑईल व वापरलेल्या बॅटरी विक्री करण्यासाठी दरपत्रकाबाबतच्या अटी व शर्तीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

३. दरपत्रक सूचनेसोबत जोडलेल्या यादीनुसार विभागातील वाहनाचे वापरलेले ऑईल व वापरलेल्या बॅटरी जास्त दर देणा-या खरेदीदारास जेथे आहे व जसे आहे तसे विक्री करणे आहे.

४. ज्या इच्छुक खरेदीदारास सदर साहित्य खरेदी करावयाचे आहे, त्यांनी दरपत्रकातील सूचनेसोबत जोडलेल्या निविदा फॉर्ममधील विवरणपत्रात दर नमूद करुन दरपत्रक दोन लिफाफा पध्दतीने बंद लिफाफ्यात नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०३० यांच्याकडे दि. २७/०६/२०२५

CamScanner

ते दि.०७/०७/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत जमा करावेत. त्यानंतर आलेल्या दरपत्रक/निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.

५. निविदाकार यांना साहित्याची प्रत्यक्ष पाहणी करावयाची आसल्यास त्यांनी दिनांक ०३/०७/२०२५ रोजी सकाळी ११.३० ते ०४.३० या कालावधीत कार्यालयात पहाणी करता येईल.

६. अनामत रक्कम रुपये १५००/- ( ना परतावा ) नियंत्रक, रोख शाखा, शासकीय परिवहन सेवा, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०३० यांच्याकडे जमा करावी. व **निविदा दरपत्रक फॉर्म घेण्यात यावा. कार्यालयातून घेतलेल्या निविदा दरपत्रक फॉर्मच ग्राह्य धरण्यात येईल.**

७. सदर विक्री ही दरपत्रक पध्दतीने करण्यात येणार असल्याने बंद लिफाप्यावर" वापरलेले ऑईल व वापरलेल्या बॅटरी खरेदीसाठी दरपत्रक असे स्पष्ट नमुद करावे तसेच लिफाफ्यावर दरपत्रक सादर करणा-याचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक नमूद करुन दरपत्रक सादर करावी.

८. * सदर दरपत्रकासोबत खरेदीदाराने तांत्रिक लिफाफ्या मधे खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

१) आधार कार्ड

२) पॅन कार्ड

३) आस्थापना दुकान परवाना / उद्योग आधार.

४) वस्तू व सेवाकर प्रमाणपत्र (GST).

५) महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड प्रमाणपत्र.

६) **बॅटरी लायसन्स विल्हेवाट लावण्याची परवाणगी दिल्याची अनुज्ञाप्ती सोबत जोडणे**

७) **ऑईल लायसन्स विल्हेवाट लावण्याची परवाणगी दिल्याची अनुज्ञाप्ती सोबत जोडणे**

९. * सदर दरपत्रकासोबत खरेदीदाराने वित्तीय लिफाफ्या मधे दर नमूद करणे.

१०. अनामत रक्कम भरल्यानंतर नियंत्रक, रोख शाखा, शासकीय परिवहन सेवा, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०३० यांच्याकडून प्राप्त झालेली पावती तांत्रिक लिफाफ्या सोबत जोडणे आवश्यक आहे, अनामन रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सादर केलेला नसल्यास दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाही.

११. दरपत्रक उघडण्याच्या विहित वेळेस संबंधित खरेदीधारकास/प्रतिनिधीस व्यक्तीशः उपस्थित रहाता येईल, तसेच उपस्थिती नसल्यास सदर दरपत्रक उपस्थित खरेदीकार/प्रतिनिधीसमोर उघडण्यात येतील व त्याबाबत अनुउपस्थित दरपत्रकधारकाची कोणतीही तक्रार चालणार नाही.

CamScanner

१२. यशस्वी खरेदीधारकास मंजूर निविदा रक्कमेतुन अनामत रक्कम वजा जाता, उर्वरित रक्कम कार्यालयीन दोन दिवसात भरणा करुन साहित्य ताब्यात घेणे आवश्यक राहील, अन्यथा त्याची दरपत्रक रद्दबातल ठरवली जाईल व अनामत रक्कमेस त्यास मुकावे लागेल.

१३. यशस्वी खरेदीदाराने दरपत्रक स्विकृतीनंतर रक्कमेचा भरणा करून तात्काळ सदर वस्तु आहे त्या ठिकाणाहुन स्वखर्चाने ताब्यात घेणे आवश्यक राहील. त्यासाठी मनुष्यबळ किंवा इतर कोणताही खर्च देण्यात येणार नाही. तसेच दरपत्रक मंजूरी नंतर सदर वस्तुची जबाबदारी खरेदीदाराची राहील,

१४. सदर वस्तु वाहतुक करताना/ताब्यात घेताना आवश्क असलेले शुल्क / कराचा भरणा, अनुषंगीक खर्चाची संपूर्ण जबाबदारी यशस्वी खरेदीदाराची राहील.

१५. यशस्वी खरेदीदाराने दरपत्रक मंजूरीनंतर कोणत्याही कारणास्तव साहित्य घेण्यास नकार दिल्यास त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल व सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत दिली जाणार नाही.

१६. दरपत्रकाबाबत खरेदीधारकाची कोणतीही अट स्विकारली जाणार नाही.

१७. कोणतेही कारण न देता दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही टप्यावर नाकारणे याचे संपुर्ण अधिकार नियंत्रक शासकीय परिवहन सेवा यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१८. यशस्वी खरेदीधारकाने वस्तु ताब्यात घेताना कार्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याबाबत मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई द्यावी लागेल.

१९. खरेदी करण्यात आलेल्या साहित्याचा डिमांड ड्राफ्ट ( D.D ) ACCOUNT OFFICER GOVERNMENT TRANSPORT SERVICE WORLI MUMBAI या नावे देण्यात यावा.

२०. साहित्य घेवून गेल्यांनतर साहित्य ज्या जागेवरून घेवून गेले आहेत त्या जागेची स्वच्छता करणे बंधनकारक आहे.

(रमेश सरफरे)
कार्यालयीन अधिक्षक,
शासकीय परिवहन सेवा,मुंबई

CamScanner

विक्री करावयाच्या साहित्याची यादी

| अनु क्र. | लिलाव साहित्य | कि.ग्रा../ लि./नग |
|---|---|---|
| २ | वाहनांची  वापरलेले बॅटरी | २७ नग |
| ३ | वाहनांचे वापरलेले ऑईल | ८८६ लिटर |

( विक्री करावयाच्या साहित्यामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. )

CamScanner